शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

## तक्रार अर्ज क्रं ३३/२०१८

१.श्रीमती. डॉ. अलका आनंदराव पाटील } तक्रार अर्जदार

विरूध्द

१.पद्मभूषण डॉ. वसंतराव पाटील महाविद्यालय, तासगाव, जि. सांगली
२. श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, ताराबाई पार्क, कोल्हापूर } वि. प

श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, ताराबाई पार्क, कोल्हापूर या संस्थेच्या पद्मभूषण डॉ. वसंतराव पाटील महाविद्यालय, तासगाव, जि. सांगली येथील सहायक प्राध्यापक, वनस्पतीशास्त्र श्रीमती. डॉ. अलका आनंदराव पाटील यांनी तक्रार अर्ज तक्रार निवारण समितीकडे वेतनमिळणे करिता दि. ०६/०३/२०१७ रोजी दाखल केला आहे.

## तक्रारीचे स्वरूप :

अर्जदार दि. १३/०८/१९९१ रोजी नमूद संस्थेच्या राजे रामराव महाविद्यालय, जत येथे पूर्णवेळ अधिव्याख्यात्या म्हणून रूजू झाल्या. त्यांची निवड विद्यापीठ समितीमार्फत करण्यात आली होती. या दिनांकापासून आजअखेर त्या सेवेत पूर्णवेळ कार्यरत आहेत. सेवेचा तपशील खालीलप्रमाणे:

१. राजेरामराव महाविद्यालय, जत – १३/०८/१९९१ पासून.
२. दत्ताजीराव कदम महाविद्यालय, इचलकरंजी – २५/०८/१९९३.
३. समाजभूषण गणपतराव काळभोर महाविद्यालय, लोणी काळभोर ०१/०७/१९९९.

४. पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगाव २१/०६/२००१.

या कालावधीत नियमानुसार देय असणारया वेतनवाढी २००५ पर्यंत देण्यात आलेल्या नाहीत. या वेतनवाढीबरोबर त्यांच्या सेवेचा विचार करून नियमानुसार स्थाननिश्चितीचे व त्या अनुषंगाने मिळणारे वेतननिश्चितीचे लाभ त्यांना अदा केलेले नाहीत. याबाबत त्यांनी मा. प्राचार्य, मा. सचिव, श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, बी.सी.यु.डी. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांना लेखी– तोंडी विनंती केली असून त्याचा कोणताही कोणीही विचार केला नाही. तरी वेतनवाढी स्थाननिश्चिती व वेतनवाढीचे लाभ देण्याबाबत संबंधीतांविरूध्द तक्रार असून ते देण्याबाबत संबंधितांना आदेश व्हावेत. अशी त्यांची मागणी आहे.

दि. २७/०८/२०१८ रोजी झालेल्या तक्रार निवारण समितीच्या बैठकीसमोर तक्रारदार डॉ. अलका आनंदराव पाटील, संस्थातर्फे श्री. एस. वाय. होणगेकर आणि महाविद्यालयातर्फे प्राचार्य श्री. डॉ. आर. आर. कुंभार हजर होते.

संस्था व महाविद्यालयातर्फे असे मांडण्यात आले की, डॉ. अलका पाटील यांचे वेतनाचे सर्व लाभ मिळणेकरिता महाविद्यालयाने सहसंचालक कोल्हापूर विभाग यांचेकडे पत्रव्यवहार केलेला आहे तसेच स्थाननिश्चितीप्रमाणे वेतन मिळालेले नाही. त्यांचे वेतन चालू आहे.

समितीच्या असे निर्देशनास आले की, तक्रारदार यांची मान्यता तदर्थ आहे. शासन आदेशानुसार दि. १९/०९/१९९१ ते २२/१०/१९९२ या कालावधीमधील ज्यांची नियुक्ती आहे त्यांना नेट सेटमधून सूट आहे. तदर्थ मान्यता असेल तर स्थाननिश्चिती होवू शकत नाही. सबब तक्रारदार यांना नियमित

मान्यता घेणे आवश्यक. त्याअनुषंगाने प्रथम नेटसेट अटीमधून सूट मिळणेकरिता प्रस्ताव देणे आवश्यक. स्थाननिश्चितीबाबतची कार्यवाहीकरिता करावा लागणारा प्रस्ताव हा तक्रारदार यांनी विद्यापीठास सादर केलेला नाही. तक्रारदाराची सर्व कागदपत्रे नियमानुसार पूर्तता होत असेल तर समितीसमोर येण्याचा प्रश्न उद्भवत नाही. तक्रारदार यांनी कथन केले की, स्थाननिश्चितीकरिता व मान्यतेकरिता प्रस्तावाबाबतची कार्यवाही माहित नसलेने त्यांनी त्याची पूर्तता केलेली नाही. सबब समितीने सुचित केले की तक्रारदार यांनी संलग्नता विभागाकडून माहिती घेवून पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

## आदेश

तक्रारदार यांच्या तक्रारअर्जामध्ये कारण न राहिलेने त्यांचा तक्रारअर्ज निकाली काढणेत येत आहे.

वरील प्रमाणे झालेल्या निर्णयाची प्रत संबंधित तक्रारदार, संस्था आणि महाविद्यालय यांना देवून तसे कळविण्यात यावे.

दि. २५/०९/२०१८

अध्यक्ष

सदस्य

सदस्य

सदस्य

सदस्य सचिव